# कल्याण डोंबिवली महानगरपालिका कल्याण (D.D.)

जा.क.कडोमपा/नरवि/वाप/कवि/ १२-१२/१३
कल्याण डोंबिवली महानगरपालिका कल्याण
दिनांक :- १४/८/२०२२

(सुधारित बांधकाम परवानगी)

श्री./श्रीमती :- रितासिंग पटेल व रेरा अधिकारा मार्फत श्री. संदीप पाटील
कुलमुखत्यारपत्रक :- श्री. कुंबर कन्ट्रक्शन तर्फे
वातुशिल्पकार :- श्री. राष्ट्रपाल जाधव ( अंधेरी पश्चिम )

विषय :- सि.स.न.--- स.न. ३३ हि.न. २ प्लॉट क्र.-- मौजे – मोहिली येथे बांधकाम करण्याच्या मंजुरीबाबत

संदर्भ :- १) आपला दि. १ / ६ / २१ रोजीचा श्री. राष्ट्रपाल जाधव वातुशिल्पकार, यांचे माफत सादर केलेला अर्ज क्र.---
२) ना ज क घा आदेशपत्र क्र.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये स.न. ३३ हि.न. २ सि.स.न. -- प्लॉट क्र. -- मौजे :- मोहिली मध्ये ३५००.०० चौ.मी क्षेत्रावर तळपर स्टील्ट, तल मजला, पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला, चौथा मजला, पांचवा मजला, साहावा मजला, सातवा मजला, आटवा मजला, नववा मजला, दहावा मजला, अकरावा मजला, बारावा मजला, तेरावा मजला, चौदावा मजला, रहिवासी, ८२३०.८० चौ.मी. चटई क्षेत्राच्या बांधकामाकरीता.

भूखंडाचा विकास करावयास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ तसेच म. प्रा. वन.र. अधिनियम १९६६ चे कलाम ४४ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दिनांक १/६/२१ च्या अर्जास अनुसरून पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या ३५००.०० चौ.मी. क्षेत्र पैकी ८२३०.८० घो.मी. चटई क्षेत्रास जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे वाडे-भिंतीच्या इमारतीच्या बांधकामाबाबत, जागेवर मुलभुत सुविधा विकसित करण्यासाठी व विनशेती वापर परवानगी मिळण्यासाठी अंतरिम स्वरूपाचे मंजुरी पत्र देण्यात येत आहे. इमारतीच्या व जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कुठलाही वाद निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी आपण जबाबदार रहाल या अटीवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

इमारत (१) स्टील्ट + १४ मजले (रहिवास).

**नगर रचनाकार**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**

१) हि अंतरिम मंजुरी पत्र दिल्याचे तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी मंजुरीपत्राचे नुतनीकण मुदत संपण्याआधी आवश्यक आहे. नूतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेला. नियमाच्या व नियोजित विकास आराखडा अनुषंगाने छाननी करण्यात येईल.
२) नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.
३) बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र मिळण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांजकडून बिनशेती परवानगी घेण्याची जबाबदारी आपणावर राहील व बिनशेतीच्या पानवानगीची एक सत्यप्रत महानगरपालिकेकडे पाठविणे आवश्यक राहील.
४) बांधकाम सुरु करण्यापूर्वी जा.क.क.डों.म.पा कडून बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र घेणेत यावे.
५) इमारतीचे बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटीप्रमाणे बांधकामप्रारंभ प्रमाणपत्र घेतलेनंतर करता येईल.
६) वाडेभिंत बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे मंजूर नकाशाप्रमाणे वाडेभिंतीचे बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे.
७) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करू नये, तसे केल्याचे आढळून आल्यास सदरचे अंतरिम मजुरीपत्र रद्द झाले असे समजण्यात येईल.
८) इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची जबाबदारी सर्वस्वी आपले वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहिल.
९) नकाशात दाखविलेल्या गाळ्यांच्या संख्येमध्ये व नियोजनामध्ये पूर्वपरवानगीशिवाय बदल करू नये.
१०) नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ मधील तरतूदी प्रमाणे जागा बाधित होत असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपलेवर राहिल.
११) जागेतून किंवा जागेजवळून अतिदाब विदयुतवाहिनी जात असल्यास संबंधित खात्याकडून ना - हरकत दाखला घेतला पाहिजे व त्याची सत्यप्रत या कार्यालयास सादर केली पाहिजे.

KALYAN DOMBIVILI MUNICIPAL CORPORATION DIST. THANE
कल्याण डोंबिवली महानगरपालिका जि. ठाणे

Scanned with OKEN Scanner

१२) सदर प्रकरणी चुकीची व अपूर्ण माहिती दिली असल्यास सदर बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र रद्द समजण्यात येईल.
१३) बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकावयाचे झाल्यास महापालिकेच्या बांधकाम खात्याची परवानगी घेणे आवश्यक राहील व त्याकरिता नियमाप्रमाणे लागणारी रक्कम (दंड झाल्यास त्यासह रक्कम) भरावी लागेल तसेच निरुपयोगी साहित्य महापालिका सांगेल त्याठिकाणी स्वखर्चाने वाहून टाकणे बंधनकारक राहील.
१४) प्रस्तुत भूखंडास पिण्याचे पाणी महानगरपालिकेकडून उपलब्धतेनुसार दिले जाईल व त्यासाठी आवश्यक ती जलवाहिनी क.डों.म.पा. च्या पाणी पुरवठा विभागाकडून दिलेल्या निर्देशानुसारस्वखर्चाने टाकणे आवश्यक राहील.
१५) सादर जागेत बांधकाम करण्याबाबतचा पूर्वीची परवाना असेल तर तो या बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रामुळे रद्द झाला असे समजण्यात यावे.
१६) गटाराचे व पावसांच्या पाण्याचा निचरा होणेकरिता महानगरपालिकेचा गटारास जोडण्यासाठी पक्क्या स्वरूपाची गटारे बांधावीत तसेच बांधकामासाठी नळाचे कनेक्शन मिळणार नाही त्यासाठी संबंधितांनी स्वतःबांधकामासाठीच्या पाण्याची व्यवस्था करावी.
१७) नकाशात रास्तारुंदीकरणाखाली दर्शविलेली जमीन तसेच अंतर्गत रस्ते, सार्वजनिक रस्त्याचा भाग समजण्यात येईल, तसेच भविष्यात रस्ता रुंदीकरणासाठी जागा लागल्यास ती क.डों.म.पा.स विनामूल्य हस्तानंतरित करावी लागेल.
१८) रेखांकन प्रस्तावातील सर्व भूखंड रस्ते, खुल्या जागा, यांची प्रस्तावित नकाशाप्रमाणे जागेवर आखणी ता.नि.भू.अ.यांचे मार्फत करुन घ्यावी व त्यांचेकडील प्रमाणित मोजणी नकाशाची प्रत ,बांधकाम प्रारंभप्रमाणपत्र दिल्या तारखेपासून एक वर्षाचे आत सादर करावी.
१९) भूखंडातील विकास योजना रस्ते क.डों.म.पा.च्या सार्व बांधकाम विभागाच्या निर्देशाप्रमाणे खडीकरण व गटार विकसित करुन क.डों.म.पालिकेस विनामूल्य हसतांतरित करावे.
२०) भूखंडातील आरक्षित भाग भरणी करून व वाडेभिंतीचे बांधकाम करुन रीतसर करारनामा व खरेदीखातासह क.डों.म.पा.स. विनामूल्य हसतांतरित करावे.
२१) जलनिःसारण विभाग व मलनिःसारण विभाग, अग्निशमन विभाग, पाणी पुरवठा विभाग, उध्यान विभाग, क.डों.म.पा. यांचे कडील ना-हरकत दाखला बांधकाम नकाशासह सादर करावा.
२२) जागेचा मालकी हक्काबाबत काही वाद असल्यास अथवा निर्माण झाल्यास त्यांचे संपूर्ण निराकरण करण्याची जबाबदारी आपली राहील.
२३) वरीलप्रमाणे सर्व ना-हरकत दाखल्यानुसार इमारतीचे नकाशात फेरबदल करणे आपणांवर बंधनकारक राहील.
२४) नकाशात दाकविल्याप्रमाणे बांधकामाचा फक्त रहिवास / वाणिज्यासाठी उपयोग करावा.
२५) भूखंडाचा पोहोच रस्ता पक्क्या स्वरूपात तयार केल्याखेरीज वापर परवाना मिळणार नाही.
२६) बांधकाम पूर्णत्वाचा दाखला घेतलेशिवाय इमारतीचा वापर सुरु करता येणार नाही. बांधकाम पूर्णतेच्या दाखल्यासाठी, वास्तुशिल्पकार व स्थापत्यविशारद यांच्या विहित नुमन्यातील दाखल्यासह रितसर प्रस्ताव सादर करण्यात यावा.
२७) ओल्या व सुख्या कचऱ्यासाठी स्वतंत्र कचराकुंड्यांची व्यवस्था करावी.
२८) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या निर्देशाप्रमाणे इमारतीत सोरऊर्जा उपकरणे बसवणे आवश्यक आहे.
२९) रेन वॉटर हार्वेस्टिंगबाबत मा. कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभागाकडून निर्देश घेऊन त्याप्रमाणेजावणी करणे आपणांवर बंधनकारक राहील.
३०) प्रत्यक्ष जागेवर इमारतीचे बांधकाम चालू कारणेपूर्वी बांधकाम मंजुरीचा फलक लावणे आपणांवर बंधनकारक राहील.
३१) पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पाणी पुरवठा सुधारणा होईपर्यंत महानगरपालिकेची राहणार नाही.
३२) बांधकाम पुर्नत्वाचा दाखला घेणेपुर्वी ' उद्यान ' विभागाकडील नाहरकत दाखला सादर करणे आपणांवर बंधनकारक राहील.

इशारा:- मंजूर बांधकाम प्रस्तावाव्यतिरिक्त केलेल्या अनधिकृत फेरबदलांबाबत आपण महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या तरतूदी नुसार दखलपात्र गुन्ह्यास पात्र राहाल.

सहाय्यक संचालक नगररचना ,
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.

१) उप आयुक्त अनधिकृत बांधकाम विभाग. क.डों.म.पा.कल्याण.
२) करनिधरिक व संकलक, क.डों.म.पा.कल्याण.
३) विद्युत विभाग, क.डों.म.पा.कल्याण.
४) पाणिपुरवठा विभाग, क.डों.म.पा.कल्याण.
५) प्रभाग क्षेत्र अधिकारी ' अ ' प्रभाग क्षेत्र, क.डों.म.पा.कल्याण.

Scanned with OKEN Scanner